# मनोगत

विश्वरचिता, विश्वव्यापक सर्व जीवांचा शुध्द आत्मा परब्रह्म प्रभु श्रीराम माझा या परमेश्वराच्या चरणी कोटी कोटी प्रणाम करतो व माझ्या प्रिय ईष्ट देवताला म्हणजेच महान रामभक्त, लक्ष्मण प्राणदाता, भक्तीचा महामेरु, राम भक्तीची शक्ती, शुरवीर, ज्ञानांचा, वैराग्याचा, बुध्दीचा, महान शक्तीचा, भक्तांच्या संकटाला लवकर धावुन येणारा व भक्तांचे रक्षण करणारा माझा प्राणेश्वर हनुमंतराया. या अंजनी पुत्राच्या चरणी कोटी कोटी प्रणाम करतो मनोगत लिहिण्याची बुध्दी द्यावी ही विनंती करतो.

माझ्या प्रिय वाचक आणि बंधुभगीनींना अंत:करणापासुन शतश: प्रणाम करतो व मनोगताला सुरुवात करतो.

## लेखकाचे दोन शब्द

धर्मधन भाग्यवंतांना माझ्या वाचक बंधुभगिनींना दोन शब्दांचे हितगुज करतांना खुप खुप आनंद होत आहे. राम नामाची अमृतधारा खंड दुसरा लिहितांना जे मला अनुभव आले खरच सांगावेसे वाटते की भगवंत किती दयाळु, कृपासिंधु, भक्तावर अफाट प्रेम करणारा, भक्ताला वेळोवेळी सद्बुध्दीची साथ देणारा, भक्तांच्या पाठीशी सदा सर्वदा राहणारा, परब्रह्म परमेश्वर राम माझा भक्तांकडून काय कार्य करुन घेईल हे आपण सांगु शकत नाही हा माझा अनुभव आहे. मला मराठी नीट वाचता येत नाही.

वेलांटी, उकार, अनुस्वार हे ही माहित नाही. व्याकरण, गद्य, पद्य, छंद कसल्याही प्रकारचे ज्ञान नाही. काव्य काय आहे? पद्य काय आहे? हे ही माहित नाही. तरी पण भगवंताची काय लिला सांगावी तेवढी कमीच. मज वेड्या कडून हा ग्रंथ लिहून घेतला हे माझ्यासाठी खरच खुप मोठा चमत्कार कृपाशिर्वादच म्हणावा.

लहान पणापासून मला राम नामाची आवड, साधु संताप्रती प्रेमभाव, श्रध्दा, विश्वास व संताप्रतीचा जिव्हाळा. या जिव्हाळ्यामुळे व प्रेमामुळे साधु संतांचे आशीर्वाद व सानिध्य लाभत गेले. खरच साधुसंत म्हणजे एक भगवंताचे परिपुर्ण सगुण स्वरुप, साधु संतांची सेवा, संगती व सुविचार मला लाभले म्हणूनच हा राम रुपी ग्रंथ रामनामाची अमृतधारा–खंड २ या ग्रंथाची अभंगरुपी रचना मी करु शकलो. श्री गजाननाने व माता सरस्वतीने माझ्यासारख्या वेड्याला बुध्दी, वाणी, स्मरणशक्ति दिली म्हणूनच मी दुसरा खंड पुर्ण करु शकलो. खरचं सांगावेसे वाटते की, ‘आले देवाजीच्या मना । तेथे कोणाचे चालेना ।।’ या न्यायाने भगवंताने माझ्या कडून ही ग्रंथरुपी सेवा करुन घेतली देवाचे अनंत उपकार राम नामाची शक्ति खरचं माझ्या सोबत होती म्हणूनच ही सद्बुध्दी प्राप्त झाली. मला तर असे वाटते की, हे आई वडिलांच्या सेवेचं, साधुसंतांच्या सहवासाचं, रामनामाच्या सत्संगाच व रामभक्तांच्या संगतीचं हे पुण्य होते म्हणूनच हे ग्रंथ रुपी कार्य ’रामनामाची अमृतधारा–२‘ ईश्वराने पुर्ण करुन घेतला. अभंग रचना करता वेळेस एक एक अनुभव असा काही येत होता की जणू काही माझे हनुमंतराया मला

प्रत्यक्षात दृष्टांत देवून अगदी भक्तीभावाने व प्रेम आदराने माझ्या कडून हे अभंग रचना करुन घेत होते असं मला प्रत्येक प्रसंगाला जाणवत होते. खरच परमेश्वराची, सनातन निराकार, भगवंताची अद्भुत शक्ती प्रत्यक्षात मला प्रेरणा देत होती. अभंग रचना करायला बसलो की, शिवपार्वतीचा आवडता प्रिय बाळ गजानन गणपती या विघ्नहर्त्याचे स्मरण मला आपोआप माझ्या वाणीतून स्फुरण होणारे शब्द प्रार्थनेच्यारुपाने गजाननाला प्रेमभावे विनवीत होते व माझ्या हनुमंताला माझे अंत:करण माझा शुध्द प्रेमभाव सांगत होता की, हनुमंता हे भक्तपालका ही अभंग रचना तुच करुन घे आणि खरोखर माझ्या अंत:करणातून प्रकट होणारे शब्द रुपी परब्रह्म माझे–राम म्हणजेच अभंग माझ्या कडून होत होते.

माझ्या वाचक बंधु भगिनींना अंत:करणापासून मी माझा अनुभव खरचं एक ईश्वराची भक्ताला प्रेरणा देणारा त्या भक्ताच्या भक्तीला प्रोत्साहन देणारा व भगवंत खरोखरच भक्ताच्या पाठीशी प्रेमभावे कृपाशीर्वाद रुपाने भक्ताच्या सोबत राहणारा हा अनुभव मी तुमच्याशी धर्मधन भाग्यवंतांशी लेखकाच्या दोन शब्दाच्या रुपाने तुमच्या समोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. रामनामाचे अंत:करणा पासून भक्तीभावे,चिंतन, स्मरण केल्याने याचे काय फळ मिळते. खरचं मनुष्याचा जीवनाचा प्रवास किती आनंदमय व सुखदायक होतो हे माझ्या लेखकाच्या दोन शब्दातले अनुभव तुम्हा सर्व वाचक बंधुभगिनींच्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही माझा असा विश्वास आहे. 'रामनामाची अमृतधारा खंड–२' याचा एक एक अभंग आपल्या मनाला, मनुष्य धर्माला खरोखरच एक चांगली भक्ती, प्रेमभावना, आचार, विचार व मनुष्य धर्माचा, मानवतेच्या कार्याचा संदेश व विनंती पूर्वक साधु संतांच्या सहवासाचा, रामनामाच्या सत्संगाचा, धर्म संस्कृती व निसर्गाच्या परोपकार धर्माचा, निसर्गाच्या अफाट प्रेमाचा संदेश दिल्याशिवाय राहणार नाही. मला अंत:करणापासून माझ्या हनुमंतरायांवर व माझ्या आत्म्याच्या आत्मारामावर मला विश्वास आहे. माझ्यावाचक बंधु भगिनींना हा ग्रंथ निश्चितच आवडेल त्यांच्या शुध्द मनाला, शुध्द विचारांना भावतील व सर्व स्विकार करतील हा माझा वाचक बंधु भगिनींवरचा विश्वास, भगवंतावरचा विश्वास व रामनामावरचं प्रेम मला विश्वास देत आहे.

हा ग्रंथ लिहितांना माझे सर्वेश्वर गुरुवर्य स्वामी सागरानंद सरस्वती या सद्‌गुरुंची कृपा व साधु संतांचे आशीर्वाद, आई वडिलांचे प्रेम आशीर्वाद होते म्हणून हा ग्रंथ पूर्ण झाला.

माझे श्रध्दास्थान मला नेहमी वेळोवेळी साथ देणारे ह.भ.प. प्रभाकर महाराज खैरनार (पाळेकर) यांची मला खूप मोठी प्रेरणा साथ मिळत गेली. अभंग वाचनाचे काम वेलांटी, उकार, अनुस्वार शब्दांचा मतीत अर्थ हे सर्व ज्ञान मला या ज्ञानी महात्म्याने सांगितले व त्यांचे अनमोल सहकार्य लाभले म्हणून मी त्यांचे अंत:करणापासून आभार मानतो. त्यांच्या या अनमोल सहकार्याला प्रणाम करतो.

तसेच माझे आवडते शिष्य सिध्देश्वरानन्द सरस्वती, सुदर्शनानन्द सरस्वती तसेच चि. आदित्य जाधव हे तीनही शिष्य म्हणावे ? की माझे देव म्हणावे ? हे मला कळत नाही. अगदी नम्रभाव, गुरुभक्ति, गुरुनिष्ठा, साधुसंताप्रती अफाट प्रेम हे तिनही साधक असून ईश्वरा सारखा यांचा भाव व मला अभंग लिहण्यासाठी, वाचण्यासाठी कार्य करणारे हे खरच खूप मोठे गुरुभक्त म्हणावे या गुरुभक्तांचा मी आभारी आहे व अंत:करणापासून त्यांचे अभिनंदन करतो तसेच ग्रंथाच्या छपाईसाठी नाशिकचे 'आकृती आर्टस्' यांचे मोलाचे सहकार्य लाभले त्याबद्दल त्यांनाही धन्यवाद देतो व त्यांचाही आभारी आहे. त्यांना श्रीरामप्रभू, हनुमंतराय आशीर्वाद देतीलच देतील पण मी अंत:करणापासून त्यांचे ऋण व्यक्त करतो.

सर्व वाचक बंधू आणि भगिनींना व रामसेवकांना, हनुमंतरायांच्या प्रिय भक्तांना अंत:करणापासून विनंती करतो तुम्ही हा ग्रंथ जरुर वाचावा व काही चुका असतील तर आम्हाला जरुर कळवावे आम्ही त्याचा स्विकार करु व दुरुस्ती करण्याचे प्रयत्न करु 'रामनामाची अमृतधारा खंड–२' हा ग्रंथ माझ्या ह्रदयाचे ठोके व रक्त वाहिन्या आहेत मला माझ्या अंत:करणापासून असे वाटते की माझा राम हे ग्रंथ तुम्हा सर्व वाचक बंधु आणि भगिनींना आवडतील अशी आशा अपेक्षा करतो.

हा ग्रंथ श्रीरामाच्या चरणी अर्पण करुन परत एकदा सर्वांची क्षमा मागतो ग्रंथा मध्ये काही त्रुटी असतील तर माझ्या वाचक बंधु भगिनींना तुमचा सेवक/बालक म्हणून क्षमा करावी अशी विनंती करतो.

हा ग्रंथ जरुर जरुर वाचावा व संग्रहीत ठेवावा अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**।। अभंग ।।**

**रामा करितो मी हट्ट एक । तुम्ही व्हावे रामा प्रकाशक ।।१।।**
**रामा लिहुनिया अक्षरं दोन । त्यामध्ये साक्षात माझे राम रमण ।।२।।**
**कोणी करो काही रे विचार । रामा मी वाहिलं तुझ्या चरणी सारं ।।३।।**
**शब्द,अक्षर जोडिले तुला विचारुनी । रामा तुझ्याच कृपेची ही शुध्द वाणी ।।४।।**
**हनुमंतदास म्हणे, तुच साक्षी एक । माझा राम रे रघूनायक ।।५।।**

तुमचे गुरुदेव

।। जय श्रीराम ।।